# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट ३५६ - २३** **दिनांक : - १३/१०/२०२३**

**फेसबुक वरील बनवाट जीओ मार्ट पेजवर ऑनलाईल शॉपिंग करत असतांनाANY DESK हे ॲपलिकेशन डाऊनलोड करण्यास भाग पाडुन तक्रारदार यांचेकडुन ओटीपी प्राप्त करुन ८०,०००/- रुपयांची फसवणुक झालेले पैसे परत मिळविण्यात काशिमीरा पोलीस स्टेशनला यश.**

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत मिरा रोड पूर्व येथे राहणारे श्री सतिश सोलंकी, हे दिनांक २६/०९/२०२३ रोजी फेसबुकवर जिओ मार्ट या ॲप्लिकेशनवर शॉपिंग केल्यावर मोठया प्रमाणात डिस्काउंट भेटत असल्याची जाहिरात पाहून तक्रारदार यांनी सदर फेसबुक पेजवरील लिंक वर जावून स्वताचे बॅंकेचे क्रेडिट कार्डचे डिटेल्स व वैयक्तिक माहिती भरल्यानंतर त्यांचे मोबाईलवर अनोळखी इसमाने जिओ मार्टची बनवाट लिंकच्या नावाखाली ***ANY DESK*** हे ॲपलिकेशन पाठूवन ते डाऊनलोड करण्यास भाग पाडले. त्यानंतर तक्रारदार यांचे क्रेडीट कार्ड मधून एकुण ८०,०००/- रुपये डेबिट होवुन तक्रारदार यांची फसवणुक झाली .

त्यानंतर तक्रारदार यांनी लागलीच दोन तासाच्या आतच काशिमीरा पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज दिला होता. त्यानंतर आवक अर्ज क्रमांक - ६४४/२०२३ दिनांक - २६/०९/२०२३ रोजी अन्वये तक्रारी अर्ज चौकशी कामी पोलीस निरीक्षक/ सोनवणे यांचेकडे प्राप्त झाला होता.

- नमूद तक्रारी बाबत वपोनि.श्री.संदीप कदम, पोलीस निरीक्षक श्री.राहुल सोनवणे व पोलीस उप निरीक्षक श्री.वैभव धनावडे यांनी तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती तक्रारदार यांचेकडुन प्राप्त केली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची फसवणूक झालेली ***80,000/-*** रुपये रक्कम हि प्रथम **Chroma digital** या ॲपवर **digital Gift Vouchers** विकत घेतल्याचे चौकशीमध्ये निष्पंन्न झाले. नमुद **Chroma digital** यांचे नोडल अधिकारी यांना पोलीस निरीक्षक/राहुल सोनवणे यांनी तात्काळ मेल करुन सदरचे ट्रांझीक्शन व्यवहार थांबविण्याबाबत कळविले होते.

त्यानंतर **Chroma digital** यांनी सदरची **Gift Vouchers** हे कॅन्सल करुन सदरची रक्कम हि तात्काळ गोठविण्यात आली . त्यानंतर **Chroma digital** यांनी ८०,०००/- रुपये रक्कम हि तक्रारदार यांचे खात्यात वर्ग केली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- अशा प्रकारे फसवे कॉल अथवा एसएसएस प्राप्त झाल्यास त्यावर कोणताही प्रतिसाद देवू नये.
- आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ईमेल,कॉल्स यांची विश्वासहर्ता ची पडताळणी करावी.
- आपले मोबाईलवर प्राप्त होणारा **OTP** किंवा आपली वैयक्तीक माहिती देवू नये.
- तसेच फसवणुक झाल्याचे लक्षात येताच लागलीच नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा जेणेकरुन Golden Hour Period मध्ये फसवणुक झालेली रक्कम परत मिळविण्याकरीता मदत होईल.

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असे कृत्य कोणी करीत असल्याचे आढळुन आल्यास तात्काळ**

**नजीकच्या पोलीस ठाणेस, तसेच सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १, विरार, श्री. महेश तरडे , सहा.पोलीस आयुक्त मिरा रोड विभाग मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय व वरिष्ठ पोलीस निरीक्षक/ श्री संदिप कदम यांचे मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक/ वैभव धनावडे यांनी पार पाडली आहे.

**----0000----**